# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२१/०९/२०१६

**१) ट्रॅक्टरच्या धडकेत जनावरांचा मृत्यु. :—**

दिनांक २०/०९/०१६ रोजी २०.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले घराकडे डांबरी रोडने आपले साईड जनावरे घेवुन जात असता यातील आरोपी ट्रॅक्टर क्र. एमएच ४० वाय १५९३ च्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजिपने चालवुन फिर्यादीची १ म्हैस, १ वघार यांना धडक मारून त्यांचे मरणास कारणीभुत होवुन शास्त्रि चौकातील डांबरी रस्त्याचे बाजुला उभा असलेला ट्रक क्र. एमएच ३६ एच ११३३ ला धडक मारून नुकसान करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी शिवशंकर गणेश कुंभलकर वय ४० वर्ष रा. पांढराबोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,४२९ भादंवि. सहकलम १८४,१३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे आमरोडवर वाहन उभी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २०/०९/२०१६ रोजी १४.०० वा. ते १४.३० वा. दर. यातील आरोपीची मिनी डोर क्र. एमएच ३६/३८४१ चा चालकाने आपले ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी ऊभी करून येणा—या जाणा—या वाहतुकीस लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुण आल्याने असे सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) लोकसेवक पदाचा दुरूउपयोग करून लाच घेतल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक. २०/०९/२०१६ रोजी १४.५० वा. दर. यातील आरोपी क्र. १ ने तक्रारदार यांचे स्वतःचे तयार केलेल्या नविन मकाणाचे बांधकामावर पाणी टाकण्याकरीता शासकीय ईलेक्ट्रीक पोलचे तारावरून डायरेक्ट घेतलेल्या लाईनवर कसल्याही प्रकारची कायदेशीर कार्यवाही न करण्याकरीता आपले लोकसेवक पदाचा दुरूउपयोग करून ३,०००/—रू. लाच ची मागणी करून तक्रारदार यांचे कडुन १,०००/—रू. त्यावेळी स्विकारल्याने व उर्वरीत २,०००/—रू. रक्कम सापडा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. २ यांचे मार्फतीने आरोपी क्र. २ यांनीच लाच रक्कम स्विकारण्यास साहय केला. असे सरतर्फे फिर्यादी पोनी. पारधी एसीबी. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ७,१२,१३,(१)(ड),१३(२) ला. प्र. का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी. भंडारा पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक २१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, सिहोरा, साकोली, पालांदुर, अडयाळ व लाखांदुर येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०८ लिटर हातभट्टी दारू + सडवा साहीत्य कि. १६५१०/—रु. तसेच १० लिटर ४४० मिली देशी/विदेशी दारू कि. ३,०००/—रू. तसेच जुगारातुन कि. २,३०,०२३/—रू. असा एकुण २,४९,५३३/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

५) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु . :–

दिंनाक. १८/०९/२०१६ रोजी २३.०० वा. दर. यातील मृतक अरूण श्रीराम हटवार वय ५५ वर्ष रा. तुमसर यांची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास उपचाराकरीता सामांन्या रूग्णालय भंडारा येथे नेले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोलीस स्टेशन तुमसर ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. नागोसे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पो. स्टे. तुमसर हे करित आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.